# शासनातील निवृत्त अधिका-यांची सेवा करार पध्दतीने घेणेबाबत

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.८ जानेवारी २०१६ अनुसरुन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातर्फे राबविण्यात येत असलेल्या संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, रत्नागिरी, नागपूर,अमरावती,लातूर आणि औरंगाबाद या विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी निवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने घेणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियाना अंतर्गत शेतकरी आठवडे बाजारासाठी योग्य जागा शोधणे, जागा मिळविण्यासाठी प्रस्ताव संबंधितांना सादर करणे, इतर परवान्या प्राप्त करणे, बाजारासाठी शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या इ. चे सदस्य फळे व भाजीपाला विक्रीसाठी तयार करणे, आवश्यक सोई सुविधांची उपलब्धता करुन देणे. तसेच बाजारांची आवश्यक माहिती वेळोवेळी कृषि पणन मंडळास सादर कऱणे.
२. सदर नेमणूक प्रथम ११ महीन्यांचे कालावधीसाठी असेल यात वाढ करण्याचा अधिकार कृषि पणन मंडळास असेल.
३. निवृत्त अधिका-यांना वर उल्लेखलेल्या शासन निर्णयानुसार मासिक वेतन (एकत्रित) निश्चित करण्यात येईल.
४. सहकार, कृषि, महसूल आणि पणन विभागातील तसेच कृषी पदवीधर असलेल्या निवृत्त अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल.
५. निवृत्त अधिका-याचे वय ६५ पेक्षा जास्त नसावे तसेच अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.
६. अधिका-यास नियुक्त करण्यात येणा-या विभागात कामकाज करावे लागेल.
७. शासन निर्णय क्रं संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.८ जानेवारी २०१६ सोबत जोडला आहे.

इच्छुकांनी आपणास करावयाच्या कामाच्या ठिकाणाच्या तपशिलानुसार आपले अर्ज मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे, प्लॉट नं.आर ७, गुलटेकडी छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, पुणे ४११०३७ या पत्यावर जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसापर्यंत जाहीरातीत नमूद केलेल्या पत्त्यावर पोहचतील असे पाठवावे. उशिरा पोहचलेले अर्ज विचारात घतले जाणार नाहीत इतर सर्व अटी व शर्ती वरील संदर्भिय शासन निर्णयानुसार असतील.

सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत......

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ८ जानेवारी, २०१६

वाचा : १. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरईएम-१०८९/प्र.क्र.२/८९/१३ दि.९ फेब्रुवारी,१९८९

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरईएम-१५९३/ प्र.क्र.७५/९३/१३, दिनांक २२ डिसेंबर,१९९३.

३. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरईएम-१५९४/४६७/१३, दिनांक ३ सप्टेंबर, १९९४

४. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीबीई-१८९३/प्र.क्र.३८/९३/तेरा दिनांक १५ फेब्रुवारी,१९९५.

५. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम-१५९५/ प्र.क्र.४८/९५/१३ दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५

६. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरईएम -१५०९/ प्र.क्र.५८/२००९/१३ दिनांक १४ जानेवारी, २०१०

प्रस्तावना :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १५.२.१९९५ अन्वये तज्ञ, सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांना विवक्षित कामांसाठी करार पद्धतीने नियुक्ती देण्यासंदर्भात सूचना आहेत. त्यानुसार विहीत अटी व शर्तीचे पालन करुन सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या मान्यतेने प्रस्तावास मुख्य सचिवांमार्फत शासनाच्या मान्यतेनंतर नेमणूक करता येते.

२. शासन निर्णय दि. ९.११.१९९५ अन्वये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना पुनर्नियुक्ती, मुदतवाढ आणि नियमित पदांवर करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबत सूचना आहेत. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना पुनर्नियुक्ती, मुदतवाढ आणि नियमित पदांवर करार पद्धतीने नियुक्ती तसेच कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्त्यांसंदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.८५/२००८ मध्ये दिलेले आदेश विचारात घेऊन विहित अटी व शर्तीचे काटेकोर पालन न करता करण्यात आलेल्या नियुक्त्या रद्द करण्याच्या सूचना शासन निर्णय १४.१.२०१० अन्वये देण्यात आल्या आहेत. तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांना मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देता येत नाही.

३. सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार (शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ.) नियमित पदांवर विहीत मार्गाने सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्ती इ. बाबतची कार्यवाही यानुसारच होईल यासाठी

तरतुदींचे पालन करुन आणि शासनाचे प्रशासकीय खर्चासंबंधातील काटकसरीचे धोरण विचारात घेऊन पदभरती शक्य होत नसल्याने करार पद्धतीने किंवा मानधन तत्वावर नेमणुका केल्या जातात. या सूचना सन १९९५ मध्ये दिलेल्या असुन त्यावेळेस निश्चित केलेली परिश्रामिक मर्यादा रु.१००००/- पर्यंत मर्यादित आहे आणि प्रस्तावास वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग, मुख्य सचिव आणि शासनाची मान्यता घेणे या बाबीसाठी कालावधी लागत असून त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज व आवश्यकता वेळोवेळी विविध बैठकांमध्ये सूचविण्यात आलेली आहे. त्यामुळे सन १९९५ मधील सूचनांमध्ये सुसूत्रता आणणे, करार पद्धतीने नेमणुका केल्यास द्यावयाच्या पारिश्रमिकामध्ये समुचित वाढ करणे तसेच करार पद्धतीने नेमणुका करण्यासाठीच्या निर्णयप्रक्रियेतील टप्पे कमी करणे आवश्यक आहे. सबब, शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, दि. १५.२.१९९५ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १५.२.१९९५ च्या मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसंदर्भात **आवश्यक सेवांसाठी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विषयनिहाय एमपॅनलमेंट** (Empanelment) करावे. उदा.

(क) आस्थापनाविषयक बाबी/ सेवाप्रवेश नियम

(ख) पायाभूत सुविधा निर्मिती.

(ग) नागरी सेवा पुरविणे.

(घ) विशेष गुप्त वार्ता इ.

(ङ) योजनांचे मुल्यमापन.

*प्रशासकीय विभागास आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा समावेश करता येईल.*

२) करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा, विहीत पद्धतीने जाहिरात देऊन अर्ज मागवावेत आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करुन सूची (Panel) तयार करावी.

३) एमपॅनलमेंट (Empanelment) तीन वर्षाच्या कालावधीकरिता करावे व त्याचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

४) शासकीय कार्यालय /शासनाचे उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्थांमधील वरीलप्रमाणे empanelment केलेले सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार (Contractual)

पद्धतीने करण्यात येणारी नियुक्ती ही नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ "विवक्षित" कामासाठीच करण्यात यावी.

५) अशा स्वरुपाच्या विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.

६) नियमित मंजूर पदांवर (Sanctioned Posts) करार पद्धतीने नियुक्ती करता येणार नाही, अशी पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात यावीत. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ११ फेब्रुवारी,२०१४ अन्वये विशेष कौशल्य धारण करणाऱ्या उमेदवारांसाठी मंजूर पदसंख्येच्या कमाल १०% इतकी पदे भरण्याबाबत जी मर्यादा विहित केली आहे त्या मर्यादेत करार पध्दतीने नियुक्ती करता येवू शकेल. करार पद्धतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरुप, आकस्मिकता, सार्वजनिक हित या बाबी विचारात घेण्यात याव्यात .

७) करार पद्धतीने नियुक्तीमुळे शासन सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

८) विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी संबंधित विभागाने निश्चित करावा आणि सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल आणि एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

९) सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह ) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे. अशा पारिश्रमिक रक्कमांची कमाल मर्यादा मासिक रु.४०,०००/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत असावी .

१०) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत /सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

११) करार पद्धतीने नियुक्ती करताना कमाल वयोमर्यादा ही ७० वर्षापेक्षा अधिक नसावी.

१२) असा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.